**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक १५ ची जबानी</u>**

मी शपथेवर सांगतो की,

| | | |
|---|---|---|
| नाव | - | संतोष बापूराव तांबे, |
| वय | - | ४४ वर्षे, |
| व्यवसाय | - | नोकरी, पोलीस निरीक्षक. |
| राहणार | - | नांदेड, ता. जि.नांदेड. |

**<u>सरतपासणी वि. अति. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.एस.देशमुख यांच्यामार्फत</u>**

१. दि.०९.०३.२०२४ ते ०६.०२.२०२५ या कालावधीत मी पोलीस स्टेशन सेनगाव येथे पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत होतो. पोलीस स्टेशन गोरेगाव येथे अपराध क्र.४१४/२०२४ हा भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१), २३८ व ३(५) अंतर्गत नोंदबध्द झाला होता व त्याचा तपास पोलीस अधीक्षक, हिंगोली यांचे दि.१८.१२.२०२४ च्या आदेशान्वये माझ्याकडे देण्यात आला होता. आता मला तो आदेश दाखविण्यात आला त्यावर पोलीस अधीक्षक, हिंगोली यांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर असून तो **निशाणी क्र.पी-७४** वर आहे.

२. उपरोक्त आदेशान्वये तपास केस डायरीसह माझेकडे प्राप्त झाल्यानंतर मी दि.१९.१२.२०२४ रोजी पशुवैद्यकीय अधिकारी, गोरेगाव यांना शासकीय कर्मचारी पंच म्हणून मिळणेस विनंती पत्र दिले. आता मला ते पत्र दाखविले. ते तेच असून त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर असून तो **निशाणी क्र.पी-७५** वर आहे. दि.१९.१२.२०२४ रोजी ग्रामपंचायत कार्यालय, गोरेगाव यांना शासकीय कर्मचारी पंच म्हणून मिळणेस विनंती पत्र दिले. आता मला ते पत्र दाखविले. ते तेच असून त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर असून तो **निशाणी क्र.पी-७६** वर आहे. सदर पत्रांच्या अनुषंगाने त्याचदिवशी वैद्यकीय दवाखाना, गोरेगाव व ग्रामपंचायत कार्यालय, गोरेगाव येथून प्रत्येकी एक कर्मचारी पंच म्हणून हजर झाल्यानंतर त्यांच्यासमक्ष आरोपी क्र.१ हरीभाऊ किसन खोडके याचेशी चौकशी केली असता त्याने सांगितले की, त्याने दगड ज्या ठिकाणी लपवून ठेवला आहे ते ठिकाण तसेच प्रेत ज्याठिकाणी

पुरले आहे ते ठिकाण तसेच मोबाईल फोडून ज्या ठिकाणी लपविला ते ठिकाण तो दाखविण्यास तयार आहे. त्याप्रमाणे त्याचे पंचांसमक्ष निशाणी क्र.पी-६३ प्रमाणे निवेदन लिहिण्यात आले व त्यानंतर त्यावर आरोपीने, पंचांनी व मी सह्या केल्या. निशाणी क्र.पी-६३ हा तोच असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यानंतर आरोपी, पंच व पोलीस कर्मचाऱ्यांसह मी शासकीय वाहनाने सदर आरोपीने सांगितल्याप्रमाणे त्याचे शेगाव खोडके या गावाकडे गेलो. आरोपी आम्हाला त्याचे स्वत:चे शेताकडे घेऊन गेला. रस्त्यावर गाडी थांबविल्यानंतर सदर आरोपी आम्हाला आरोपी क्र.२ पवन आखाडेच्या शेतातील विहीरीजवळ घेऊन गेला. त्या विहीरीपासून काही अंतरावरुन आरोपीने त्या कापसाच्या शेतातून एक दगड काढून दिला. तो दगड आम्ही पंचांसमक्ष जप्त केला. दगड मुद्देमाल वस्तू क्र.८ हा तोच आहे. त्यानंतर आरोपी आम्हाला धुऱ्यावरील तारेच्या कुंपणाखालून दुसऱ्या शेतात घेऊन गेला. त्या शेतातून आरोपी आम्हाला नाल्याकडे घेऊन गेला व त्या नाल्यामध्ये ज्या ठिकाणी प्रेत पुरलेले होते ते ठिकाण दाखविले. त्या ठिकाणापासून १०० ते १५० मीटर अंतरावर आरोपी आम्हाला घेऊन गेला व ज्या ठिकाणी मोबाईल फोडून कॅरीबॅगमध्ये लपवून ठेवलेला होता ते ठिकाण त्याने दाखविले व तो मोबाईल कॅरीबॅगसह काढून दिला. तो मोबाईलसुध्दा मी पंचांसमक्ष कॅरीबॅगसह जप्त केला. मोबाईल मुद्देमाल वस्तू क्र.९ हा तोच आहे. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशनला परत आलो. न्यायालयातील टी.व्ही.वर दिसत असलेला आरोपी हा तोच हरीभाऊ खोडके आहे. (*आरोपी क्र.१ हरीभाऊ किसन खोडके यास जिल्हा कारागृह, परभणी यांनी दृकश्राव्य माध्यमाद्वारे हजर केलेले असून त्यास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव हरिभाऊ किसन खोडके असे सांगीतले*).

३. पोलीस स्टेशनला परत आल्यानंतर त्याचदिवशी म्हणजे दि.१९.१२.२०२४ रोजी आरोपी क्र.२ पवन आखाडे यास पंचांसमक्ष विचारपूस केली असता त्याने सांगितले की, टिकाव, फावडे व टोपली हे त्याने त्याचे शेतात लपविले असून तो ते काढून देण्यास तयार आहे. त्याप्रमाणे त्याचे निवेदन पंचांसमक्ष लिहिण्यात आले व त्यानंतर त्यावर पंचांनी, आरोपीने व मी सह्या केल्या. निवेदन

पंचनामा निशाणी क्र.पी-६५ हा तोच असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यानंतर सदर आरोपीच्या सांगण्याप्रमाणे आम्ही पोलीस कर्मचारी, पंच व सदर आरोपीसह शेगाव खोडके या गावाच्या पुढे दोन किमी अंतरावर आरोपीने शासकीय वाहन थांबविण्यास सांगितले म्हणून आम्ही वाहन रोडवर थांबवून त्याच्या मागे मागे एका शेतात गेलो. (यावेळेस साक्षीदाराने विनंती केली की, मूळ अभिलेख पाहण्याची त्यांना परवानगी देण्यात यावी. साक्षीदार तपासी अधिकारी असल्यामुळे परवानगी देण्यात येते). त्या शेतामध्ये एक पत्राचे शेड होते व त्या शेडमधून आरोपीने एक टिकाव, एक फावडा व एक टोपली काढून दिले. ते आम्ही पंचांसमक्ष जप्त केले व त्याचा पंचनामा केला व त्यानंतर त्यावर पंचांच्या व आरोपीच्या सह्या घेऊन मी सुध्दा सही केली. पंचनामा निशाणी क्र.पी-६६ हा तोच असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. ते टिकाव/टिकास, फावडा व टोपली मी ओळखू शकतो. टिकाव/ टिकास मुद्देमाल वस्तू क्र.१०, फावडा मुद्देमाल वस्तू क्र.११ व टोपली मुद्देमाल वस्तू क्र.१२ हे तेच आहेत. न्यायालयात हजर असलेला आरोपी हा तोच पवन आखाडे आहे. (न्यायालयाने सदर आरोपीस त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव पवन धोंडबाराव आखाडे असे सांगितले).

४. पंचनामे निशाणी क्र.पी-६३ ते पी-६६ च्या संपूर्ण कार्यवाहीचे आम्ही मोबाईलमध्ये चलचित्रीकरण केले व त्याचा सॅनडिस्क कंपनीचा १६ जीबीचा पेन ड्राईव्ह अभिलेखावर एका सीलबंद लिफाफ्यामध्ये दाखल करण्यात आलेला आहे. (सदर लिफाफा आरोपींचे वि.वकीलांसमक्ष उघडण्यात आला व त्यामधून एक पेन ड्राईव्ह काढण्यात आला). आता मला तो पेन ड्राईव्ह दाखविण्यात आला हा तोच असून तो **निशाणी क्र.पी-७७** वर आहे. (यावेळेस वि.अतिरीक्त सरकारी वकील यांनी सदर पेन ड्राईव्ह न्यायालयातील संगणकावर लावून त्यातील चलचित्रीकरण दाखविण्याची विनंती केली, म्हणून न्यायालयातील संगणकावर पेन ड्राईव्ह लावून चलचित्रीकरण पाहण्यात आले). (सदर पेन ड्राईव्ह सुरु केल्यानंतर त्यामध्ये दोन फोल्डर असून त्यापैकी पहिल्या फोल्डरमध्ये तीन व्हीडीओ फाईल्स असून दुसऱ्या फोल्डरमध्ये चार व्हीडीओ फाईल्स आहेत. त्या सर्व व्हीडीओ फाईल्स एक एक

करुन खुल्या न्यायालयात साक्षीदाराने आरोपी व त्यांचे वकील व वि. अति. सरकारी वकील यांच्यासमक्ष बघितल्या). हे त्याच दोन्ही आरोपींच्या निवेदन व जप्ती पंचनाम्याचे कार्यवाहीचे चलचित्रीकरण आहे. सदर चलचित्रीकरण पोलीस कर्मचारी नवले यांच्या मोबाईलमध्ये करण्यात आले होते व त्या मोबाईलमधून लॅपटॉपच्या सहाय्याने ते या पेन ड्राईव्हमध्ये घेण्यात आले होते. सदर सात ही फाईल्सचे हॅश व्हॅल्यू काढण्यात आले होते व ते आम्ही दोषारोपपत्रास दाखल केले आहे. आता मला ते हॅश व्हॅल्यूचे पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही व शिक्का असून त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यास **निशाणी क्र.पी-७८** वर आहे. (यावेळेस आरोपीचे वि.वकीलांनी सांगितले की, सदर पेन ड्राईव्हमधील डेटा बचाव पक्षास देण्यात आलेला नाही).

५. तपासादरम्यान मी साक्षीदारांचे बयाण नोंदविले. मी साक्षीदार किसन खोडके, संतोष खोडके, ओमकार खोडके, निखील शिंदे, श्रीकांत खोडके, राम खोडके यांचे बयाण त्यांचे सांगण्याप्रमाणे नोंदविले होते. साक्षीदार किसन खोडकेने माझ्यासमक्ष त्याच्या बयाणातील अधोरेखांकित भाग ब वरील मजकूर सांगितला होता तो **निशाणी क्र.पी-७९** वर आहे. साक्षीदार संतोष खोडकेने माझ्यासमक्ष त्याच्या बयाणातील अधोरेखांकित भाग अ व ब वरील मजकूर सांगितला होता तो **निशाणी क्र.पी-८० व ८१** वर आहे. साक्षीदार ओमकार खोडकेने माझ्यासमक्ष त्याच्या बयाणातील अधोरेखांकित भाग अ,ब व क वरील मजकूर सांगितला होता तो **निशाणी क्र.पी-८२, ८३ व ८४** वर आहे. साक्षीदार निखील शिंदेने माझ्यासमक्ष त्याच्या बयाणातील अधोरेखांकित भाग अ,ब,क व ड वरील मजकूर सांगितला होता तो **निशाणी क्र.पी-८५, ८६, ८७ व ८८** वर आहे. साक्षीदार श्रीकांत खोडकेने माझ्यासमक्ष त्याच्या बयाणातील अधोरेखांकित भाग अ ते ड वरील मजकूर सांगितला होता तो **निशाणी क्र.पी-८९ ते ९२** वर आहे. साक्षीदार राम खोडकेने माझ्यासमक्ष त्याच्या बयाणातील अधोरेखांकित भाग अ ते ड वरील मजकूर सांगितला होता तो **निशाणी क्र.पी-९३ ते ९६** वर आहे.

६. दि.२२.१२.२०२४ रोजी मी पंचांसमक्ष किसन नामदेव खोडके यांचेकडून हिरो होंडा कंपनीची एम.एच.३७ ए.सी.७१५० हा क्रमांक असलेली एक मोटरसायकल जप्त करुन त्याचा जप्ती पंचनामा तयार केला व त्यावर पंचांच्या व किसन खोडके यांच्या सह्या घेऊन मी सुध्दा सही केली. आता मला तो पंचनामा दाखविण्यात आला त्यावर आमच्या सह्या असून त्यातील मजकूर खरा व बरोबर असून तो **निशाणी क्र.पी-९७** वर आहे.

**मध्यंतरामुळे उर्वरीत सरतपास दुपारपर्यंत तहकूब.**

स्वाक्षरीत/-
दिनांक ०३.०८.२०२६. (टी.एस.अकाली)
सत्र न्यायाधीश, हिंगोली.

**मध्यंतरानंतर उर्वरीत सरतपास वि. अति. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.एस.देशमुख यांच्यामार्फत शपथेवर सुरु -**

७. सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल मी माझे दि.२३.१२.२०२४ चे पत्रासह प्रादेशिक न्याय्यसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, नांदेड येथे पोलीस शिपाई आर.व्ही. मैंदकर याचेमार्फत पाठविले. निशाणी क्र.पी-४२ वरील पत्र हे तेच असून त्यावर माझी सही व शिक्का असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. शवविच्छेदनानंतर डॉक्टरांकडून मृतकचा मिळालेला व्हीसेरासुध्दा मी प्रयोगशाळेत माझे दि.०२.०१.२०२५ च्या पत्रासह पोलीस शिपाई रणखांब यांच्यामार्फत पाठविला. आता मला ते पत्र दाखविण्यात आले ते तेच असून त्यावर माझी सही व शिक्का असून त्यातील मजकूर खरा व बरोबर असून ते **निशाणी क्र.पी-९८** वर आहे.

८. प्रकरणतील काही प्रमुख साक्षीदारांचे जबाब मी भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या कलम १८३ प्रमाणे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सेनगाव यांचेकडून नोंदवून घेतले.

९. आरोपी हरीभाऊ खोडके, पवन आखाडे तसेच मयत शिवाजी खोडके व हरीभाऊच्या पत्नीच्या मोबाईलचे सी.डी.आर. व एस.डी.आर.

मिळण्याकरीता मी पोलीस अधीक्षक, हिंगोली यांना पत्र लिहिले. आता मला ते पत्र दाखविण्यात आले ते तेच असून त्यावर माझी सही व शिक्का असून त्यातील मजकूर खरा व बरोबर असून ते **निशाणी क्र.पी-९९** वर आहे. मी दि.२७.०१.२०२५ च्या पत्रान्वये पोलीस अधीक्षक, हिंगोली यांना आरोपी व मयताचे सी.डी.आर. व एस.डी.आर. संबंधित कंपनीचे नोडल ऑफिसर यांचेकडून प्रमाणित करुन मिळणेस विनंती केली होती. आता मला ते पत्र दाखविण्यात आले ते तेच असून त्यावर माझी सही व शिक्का असून त्यातील मजकूर खरा व बरोबर असून ते **निशाणी क्र.पी-१००** वर आहे. दोन्ही आरोपी, मयत व आरोपी हरीभाऊच्या पत्नीच्या मोबाईलचे सी.डी.आर. मला प्राप्त झाले व ते मी दोषारोपपत्रासह दाखल केले आहे.

१०. तपासामध्ये आरोपींविरुध्द मला सबळ पुरावा प्राप्त झाल्याने मी त्यांचेविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

**उलटतपास आरोपी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री.साकळे एम.एस. यांचेकडून**

११. दि.१९.१२.२०२४ रोजी तपासाची कागदपत्रे मला प्राप्त झाली. मला जी कागदपत्रे प्राप्त झाली होती त्यामध्ये घटनास्थळ पंचनामा, मरणोत्तर पंचनामा व इतर कागदपत्रे होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ हरीभाऊ याने स्वत: मयत हरविल्याबद्दलची तक्रार पोलीस स्टेशन येथे दिली होती. हे मला निश्चीत सांगता येणार नाही की, हरवल्याची तक्रार दिल्यानंतर आरोपी क्र.१ हा सतत पोलीसांकडे मयताच्या शोधाबद्दलच्या तपासाकरीता येत जात होता. हे म्हणणे खरे आहे की, दि.१५.१२.२०२४ पासून आरोपी क्र.१ हा पोलीस कोठडीमध्ये होता. आरोपी क्र.१ हा शेतकरी असून तो त्याच्या वडीलांच्या शेतात कामसुध्दा करतो हे मला तपासादरम्यान कळाले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१, मयत व त्यांचे वडील हे एकत्र राहत होते व त्यांचे कामकाज एकत्रच होते. आरोपी क्र.१ ने मयताविरुध्द किंवा मयताने आरोपी क्र.१ विरुध्द पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केल्याची बाब मला तपासादरम्यान दिसून आली नाही. मी घटनास्थळावर जाण्याअगोदरच तेथे बरेच लोक व पोलीस गेलेले होते व पोलीसांनी तेथे

घटनास्थळाचा पंचनामासुध्दा केलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याकडे तपास येण्यापूर्वीच मयताचे प्रेत ज्या ठिकाणी पुरलेले होते ते ठिकाण लोकांना व पोलीसांना माहित झाले होते व त्या ठिकाणावरुन प्रेत काढून पोलीसांनी ते शवविच्छेदनाकरीता सुध्दा पाठविलेले होते.

१२. हे म्हणणे खरे आहे की, पत्र निशाणी क्र.पी-७५ व ७६ वर पोलीस स्टेशनचा जावक क्रमांक नाही तसेच ते त्या संबंधित कार्यालयात प्राप्त झाल्याबाबतची पोहच अथवा त्यांचा आवक क्रमांक या पत्रांवर नाही.

१३. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा निशाणी क्र.पी-६४ मध्ये असे नमूद नाही की, आरोपी क्र.१ हरीभाऊ हा आम्हाला त्याचे शेतात घेऊन गेला व तेथून आरोपी क्र.२ च्या शेतात असलेल्या विहीरीजवळ घेऊन गेला व विहीरीजवळील कापसाच्या शेतातून त्याने एक दगड काढून दिला. तपासादरम्यान मी कोणत्याही शेतीच्या मालकी हक्काबाबत कागदोपत्री पुरावा गोळा केला नाही. मी हे आज सांगू शकत नाही की, दगड ज्या शेतातून जप्त केला त्या शेताला चारही बाजूने कुंपण होते किंवा नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतात की, एका धुऱ्यावर तारेचे कुंपण होते. हे म्हणणे खरे आहे की, दगड जप्त केल्याची जागा, प्रेत पुरलेली जागा व मोबाईल ज्या ठिकाणावरुन जप्त झाला त्या जागेच्या आजूबाजूला इतर लोकांची वहितीची शेती आहे. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा निशाणी क्र.पी-६४ च्या कार्यवाहीच्या वेळेस आरोपी क्र.१ हरीभाऊच्या हातामध्ये हातकडी होती. आरोपी क्र.१ हरीभाऊला जेव्हा मी चौकशी केली तेव्हा तेथे पोलीस कर्मचारीसुध्दा होते. आरोपी क्र.१ हरीभाऊचे निवेदन लिहिण्यापूर्वी मयताकडे मोबाईल होता किंवा नाही याबाबतचा तपास मी केलेला नव्हता. मोबाईल मुद्देमाल वस्तू क्र.९ जप्त केल्यानंतर त्याची ओळख मी मयताच्या नातेवाईकांकडून किंवा कोणत्याही साक्षीदाराकडून करुन घेतली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हरीभाऊने निशाणी क्र.पी-६३ प्रमाणे कोणतेही निवेदन दिले नाही तसेच निशाणी क्र.पी-६४ प्रमाणे त्याने कोणतीही जागा दाखवली नाही तसेच दगड किंवा मोबाईलसुध्दा काढून दिला नाही. हे म्हणणे खरे

नाही की, मोबाईल मुद्देमाल वस्तू क्र.९ हा मयताचा नाही म्हणून त्याबाबत ओळख पटविण्याचा मी प्रयत्न केला नाही. दगड मुद्देमाल वस्तू क्र.१० मी अंगुलीमुद्रातज्ञाकडे पाठविला नाही तसेच त्यावरील बोटांचे ठसे मी घेतले नाही. निवेदन पंचनामा निशााणी क्र.पी-६३ हा आरोपीने सांगितल्याप्रमाणे माझ्या लेखनिकाने लिहिला. जप्ती पंचनामा निशाणी क्र.पी-६४ मधील ज्या पध्दतीने कार्यवाही झाली त्या पध्दतीने माझ्या सांगण्याप्रमाणे माझ्या लेखनिकाने तो तयार केला. निवेदन पंचनामा निशाणी क्र.पी-६३ मधील परिच्छेद क्र.४ मधील मजकूर फक्त आरोपीने सांगितला व इतर मजकूर आम्ही लिहिला. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र.पी-६३ व पी-६४ वरील पंचनामे आम्ही चुकीचे तयार करुन त्यावर पंचांच्या फक्त पोलीस स्टेशनमध्ये बसून सह्या घेतल्या. सदर पंचनाम्याचे चलचित्रीकरण मोबाईलमधून लॅपटॉपमध्ये व त्यानंतर पेन ड्राईव्हमध्ये घेण्यात आले याबाबतचा स्वतंत्र पंचनामा पंचांसमक्ष मी तयार केला नाही.

१४. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदार किसन खोडकेने माझ्यासमक्ष त्याच्या बयाणातील निशाणी क्र.पी-७९, साक्षीदार संतोष खोडकेने त्याच्या बयाणातील निशाणी क्र.पी-८० व ८१, साक्षीदार ओमकार खोडकेने त्याच्या बयाणातील निशाणी क्र.पी-८२ ते ८४, साक्षीदार निखील शिंदेने त्याच्या बयाणातील निशाणी क्र.पी-८५ ते ८८, साक्षीदार श्रीकांत खोडकेने त्याच्या बयाणातील निशाणी क्र.पी-८९ ते ९२ व साक्षीदार राम खोडकेने त्याच्या बयाणातील निशाणी क्र.पी-९३ ते ९६ वरील मजकूर सांगितला नव्हता.

१५. मी तपासादरम्यान श्वानपथकाला पाचारण केले नव्हते. माझ्या अगोदरच्या तपासी अधिकाऱ्यांनी श्वानपथकाला पाचारण केले होते किंवा नाही हे मला आज आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना या प्रकरणात खोटे गोवलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींविरुध्द कोणताही पुरावा नसताना खोट्या कागदपत्रांच्या आधारे त्यांच्याविरुध्द चुकीचे दोषारोपपत्र दाखल केले असून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपी क्र.२ तर्फे विधीज्ञ श्री.नायक पी.व्ही. यांचेकडून</u>**

१६. हे म्हणणे खरे आहे की, निवेदन पंचनामा निशाणी क्र.पी-६५ वर पंचनाम्याची वेळ नमुद नाही. जप्ती पंचनामा निशाणी क्र.पी-६६ नुसार ज्या शेतामध्ये ते टीनपत्राचे शेड होते त्यांच्या मालकी हक्काबाबतचा किंवा ताब्याबाबतचा कागदोपत्री पुरावा मी हस्तगत केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा निशाणी क्र.पी-६५ नुसार आरोपी क्र.२ ने कोणतेही निवेदन दिले नाही तसेच त्याने मुद्देमाल वस्तू क्र. १०, ११ व १२ काढून दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीच्या पध्दतीने तपास करुन आरोपींविरुध्द खोटे दोषारोपपत्र दाखल केले.

**<u>फेरतपास वि. अति. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.एस.देशमुख यांनी नाकारला.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/-
(टी.एस.अकाली)
सत्र न्यायाधीश, हिंगोली.

दिनांक ०३.०८.२०२६.